# दि मालेगांव मर्चन्टस् को.ऑप.बँक लि., मालेगांव

३७९, मामको भवन, सोमवार वॉर्ड,
मालेगांव - ४२३ २०३ नाशिक

## ५८ वार्षिक सर्वसाधारण सभा- सन २०१९-२० च्या सभेची नोटीस
## (फक्त सभासदांसाठी)

बँकेच्या सर्व सभासदांना विनंतीपुर्वक कळविण्यात येते की, बँकेची ५८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २७.०३.२०२१ रोजी दुपारी ठिक १२.०० वाजता खालील विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी मा.चेअरमन ॲड.भरत श्रीधर पोफळे यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. सदर सभा यंदाच्या कोविड-१९ साथीच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या निर्देशांचे पालन करण्याकरिता म.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था पुणे यांचे दि.२५ फेब्रूवारी २०२१ रोजीच्या परिपत्रकातील निर्देशानुसार व्हीसी(Video Confersing)किंवा (Other Audio Visual means)द्वारे आयोजित केली आहे. सदर सभा ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती अपेक्षित नाही. त्यामुळे बँकेचे कार्यालयीन सभागृह हे सभास्थान मानन्यात येईल. तरी या सभेस ऑनलाईन उपस्थित रहावे ही विनंती.

### ----- सभेपुढील विषय -----

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २६.०९.२०१९ रोजीच्या सभेचे इतिवृत वाचून कायम करणे.

२. संचालक मंडळ यांनी तयार केलेला सन २०१९-२० सालाचा कामकाजाचा अहवाल व आर्थिक तक्त्यांचा म्हणजे दि. ३१.०३.२०२० अखेरचे नफातोटा पत्रक व ताळेबंदास कार्योत्तर मंजूरी देणे.

३. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०१९-२० वर्षाच्या नफा वाटणीस कार्योत्तर मंजूरी देणे.

४. सन २०१८-१९ चे वैधानिक लेखापरिक्षणाच्या दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.

५. सन २०१९-२०२० सालाचा वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची वाचून नोंद घेणे.

६. संचालक मंडळाने तयार केलेल्या सन २०२०-२०२१ च्या अंदाजपत्रकास व मागील वर्षी अंदाजपत्रकापेक्षा अधिक झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी देणे.

७. सन २०२०-२०२१ करिता अंतर्गत तपासणीसांची नेमणूक केल्याची व त्यांचा मेहनताना बाबत कार्योत्तर मंजूरी देणे.

८. सन २०२०-२०२१ ह्या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखा परिक्षकाची नियुक्ती व त्यांचा मेहनतानाबाबत कार्योत्तर मंजूरी देणे.

९. एकरकमी कर्ज परतफेड योजना व राष्ट्रीय लोकअदालत अंतर्गत अहवाल वर्षात बंद केलेल्या कर्ज खात्यांची नोंद घेणे.

१०. बँकेचे मा.संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाचे सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(२) नुसार माहिती घेऊन नोंद घेणे.

११. बँकेने वर्धमाननगर शाखेची जागा खरेदी केल्याची नोंद घेण्यात येवुन खरेदीस मान्यता देणे.

१२. मा.जिल्हा उपनिबंधक सो.सहकारी संस्था नासिक यांनी परवानगी दिलेल्या बँकेच्या कॅम्पशाखेच्या जागा खरेदीस मान्यता देणे.

१३. बँकेच्या सटाणारोड शाखेच्या प्रस्तावित जागेच्या खरेदीस मान्यता देणे.

१४. बँक इमारत दुरुस्ती, नविन फर्निचर बनविणे यास मान्यता देणे तसेच बँकेच्या नियोजीत संगमेश्वर शाखा, ४० गांव फाटा व मनमाड चौफुली येथे जागा/इमारत खरेदी करणेस मान्यता देणे.

१५. रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार व्यवस्थापकीय संचालक मंडळाची स्थापना करण्यास मान्यता देणेबाबत.

१६. बँकेच्या पोटनियमात दुरुस्ती करणेबाबत.

१७. मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नासिक यांच्या दि.०१.०२.२०२० च्या पत्रानुसार सेवक आकृतीबंधास मिळालेल्या मंजुरीनुसार सेवक भरतीस मान्यता देणेबाबत.
१८. बँकेची ही सभा धरुन एकूण पाच वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित राहू न शकलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१९. मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्यावेळी येणा-या विषयांवर विचार करणे.

**संचालक मंडळाच्या आदेशावरुन**

कैलास ए.जगताप
जनरल मॅनेजर
दिनांक: ०८.०३.२०२१

ॲड.भरत श्रीधर पोफळे
चेअरमन

**विशेष सुचना:-**

१)ज्या सभासदांना सभेत अहवाल वर्षातील कामकाजासंबंधी प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि. २०.०३.२०२१ अखेर कामकाजाच्या वेळेत बँकेच्या प्रशासकीय कार्यालयात लेखी आणून देण्याचे करावे.

२)मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त बँकेच्या मुख्य कार्यालयात व शाखा कार्यालयात कामकाजाच्या वेळेत उपलब्ध आहे.

३)सन २०१९-२०२० चे आथिक पत्रके व वैधानिक तपासणी अहवाल कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत बँकेच्या प्रशासकीय कार्यालयात पहावयास मिळेल.

बँकेच्या सभासदांना या प्रस्थापित ऑनलाईन सभेची सुचना निर्धारित कायद्याच्या अंतर्गत ई-मेल/एसएमएस द्वारा सोईचे व्हावे याकरिता बँकेचे सर्व भागधारक सभासदांचे वैयक्तिक विवरण(जसे सभासदांचे नाव,सभासद क्रमांक,ई-मेल आय डी) बँकेजवळ असणे आवश्यक आहे. तेव्हा सर्व भागधारक सभासदांना विनंती आहे की या जाहिरात प्रकाशन तारखेपासुन दिनांक १८.०३.२०२१ पावेतो आपले उपरोक्त विवरण बँकेच्या ९४२२२५४७९१ या व्हॉटसॲप किंवा मेसेजद्वारे तथा बँकेच्या ईमेल आयडी admin@mamcobank.com यावर पाठवावे तसेच आपल्या सोईनुसार बँकेच्या मुख्यालयात जावुन माहिती नोंदवावी. बँकेकडे उपरोक्त विवरण सादर केल्याशिवाय सभासदांना लिंक पाठविणे शक्य होणार नाही. त्यामुळे संभाव्य ऑनलाईन सभेमध्ये सहभागी होता येणार नाही. तसेच सभेमध्ये सहभागी होण्यासाठी आपल्याकडे इंटरनेट, लॅपटॉप, किंवा एन्ड्राईड मोबाईल(व्हॉटस्ॲप नंबरचा)असणे आवश्यक आहे याची कृपया नोंद घ्यावी.